# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/11/2022 (शनिवार) सकाळ

## दुखापत

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील सावनेर ते नागपुर रोड, पब्लीक स्कुल समोर दिनांक १८/११/२०२२ चे १०.३० वा. सुमारास यातील आरोपी नामे— १) संजय गुप्ता, रा. सावनेर व दोन अनोळखी इसम यांनी संगनमत करून आरोपी संजय गुप्ता यांचे ऑटोमोबाईलचे दुकानात काम करणारे यातील जखमी नामे—प्रविण रिमोंच विंच, रा. वर्जुर साटोली, राज्य छत्तीसगड याला विनाकारण हातबुक्क्याने मारपीट करून लाकडी काठीने डोक्यावर, तोंडावर, पाठीवर, पायावर मारून गंभीर जखमी केले. शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— हितेश नंदकुमार बंसोड, वय ३६ वर्ष, रा. एन. के. बार समोर सावनेर यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द ३२६, ५०४, ५०६, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार, ब. नं. १५५३ श्री. प्रकाश नांदुरकर मो. क्र. ८६०५३८१५९३ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत कुही ते चिपडी गावाचे मधात गॅस गोडावुन समोर दिनांक ०७/११/२०२२ चे सकाळी ११.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे— आशिष दिलीप गोंडाणे, वय ३३ वर्ष, रा. आजनी हा यातील महिंद्रा मॅक्स चारचाकी क्र. एम एच—११, वाय—०९९७ चा चालक व मालक आरोपी नामे— रिंकु श्रावण ढेंगे, वय ३० वर्ष, रा. आकोली याच्या वाहनाने मजुरीच्या कामाकरिता कुही ते मांढळ येथे जात असतांना यातील नमुद आरोपीने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व हयगयीने, वेगाने चालवुन यातील मृतक हा सदर वाहनातुन खाली रोडवर पडुन गंभीर जखमी होवुन उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरकारतर्फे पोलीस नाईक ब. नं. ५४८ ग्यानीवंत गुरपुडे, पोलीस स्टेशन कुही यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठमके पोलीस स्टेशन कुही मो. नं. ८७८८५५३१३९ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**